ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख १८ जून, १९५२ | अंक २५

## विविध माहिती

**भारतांत आलेले परकीय प्रवासी**— १९५१ सालीं भारतांत येण्यासाठीं १०,००० लोकांपेक्षा अधिक जणांना परवाने देण्यांत आले. सर्वांत अधिक नागरिक अमेरिकेचे आले. ४,८१३ अमेरिकन नागरिकांना प्रवास-परवाने देण्यांत आले. त्यांच्या खालोखाल अफगाण नागरिक आले. बाकीच्या राष्ट्रांतील प्रवाशांची संख्या पुढीलप्रमाणें आहे:-ब्रह्मदेश १,७८२, जर्मनी ६९७, जपान ६५१, चीन २३५, रशिआ ९४.

**स्वीडनमधील अपघात**— स्वीडनमधील कारखान्यांत दरवर्षी सरासरी ३,००,००० अपघात होतात. अपघातांत सुमारें ५०० माणसें मरण पावतात व ३,००० कामगार अपंग होतात. कारखान्यांच्या मालकांना ह्या अपघातापायीं दरवर्षी सुमारें ३,४५,००,००० पौंड नुकसान सोसावें लागतें.

**काड्याच्या पेट्यांचे कारखाने**— द. भारतांत काड्याच्या पेट्या तयार करणारे १५० कारखाने असून त्यामधून २०,००० मजूर काम करतात. कारखान्यांना अलीकडे गंधकाचा पुरवठा नीटसा होत नाहीं आणि तयार माल पाठविण्यास पुरेशा वॅगन्सहि मिळत नाहींत अशी तक्रार करण्यांत आली आहे. सर्व कारखान्यांत मिळून रोज २५,००० ग्रोस पेट्या तयार होतात. त्या वाहून नेण्यासाठीं १० वॅगन्सची जरूर असते.

**बिहारमध्यें गंधक**—बिहारमधील अमजोर या भागांत सुवर्णमुखी गंधकाचे ५० हजार टन वजनाचे थर सांपडले आहेत. थरांची जाडी २५० फूट आहे. बिहाराशिवाय मद्रास राज्यांतील अर्काट आणि कारवार येथें व म्हैसूर राज्यांतहि गंधकाचा शोध लागला आहे.

**भारताला फोर्ड फौंडेशनची मदत**—भारताला फोर्ड फौंडेशनकडून १२ लाख डॉलर्स आतांपर्यंत मिळाले आहेत. ह्या मदतींतून ५ शिक्षण केंद्रें आणि १५ समाजविकास योजना चालू करण्यांत आल्या आहेत. मदतीच्या रकमेंतून भांडवली व चालू असे दोन्ही खर्च भागविण्यांत येणार आहेत.

**फोनसाठीं पैसे द्यावे लागणार**— दिल्ली येथील कॉन्स्टिट्यूशन क्लबांत वास्तव्य करणाऱ्या लोकसभेच्या सभासदांना आपल्या खोलींतील टेलिफोनसाठीं ह्यापुढें पैसे द्यावे लागणार आहेत. आतांपर्यंत ट्रंक कॉल्स खेरीज इतर कॉल्ससाठीं त्यांना पैसे द्यावे लागत नसत.

**अमेरिकेची लोकसंख्या**— १, एप्रिल १९५० ह्या दिवशीं अमेरिकेंतील लोकसंख्या १५,४२,३३,००० होती, असें जाहीर करण्यांत आलें आहे. दहा वर्षांपूर्वी झालेल्या शिरगणतींत अमेरिकेची लोकसंख्या ह्यापेक्षां २ कोटींनीं कमी होती. लोकसंख्येंत झालेली वाढ १४·९ टक्के आहे.

**बोलपट-परिषद**—भारतामधील बोलपट-निर्माते, वितरक आणि थिएटरवाले ह्यांची एक परिषद ता. ७ जुलै रोजीं मुंबई येथें भरणार आहे. ह्या धंद्यावर बसविण्यांत आलेल्या निरनिराळ्या करांमुळें तो फार कठीण परिस्थितींत सांपडला असल्याचें फिल्म फेडरेशन ऑफ इंडिआचे अध्यक्ष, श्री. चंदूलाल शहा ह्यांनीं सांगितलें. करांच्या बाबतींत सरकारकडून सवलती मागण्याचा परिषदेचा विचार आहे.

**रेल्वेसाठीं नवीं एंजिनें**—भारत सरकारनें दक्षिणेंतील रेल्वेसाठीं मागविलेलीं एंजिनें ' जलकीर्ती ' ह्या बोटीनें मद्रास बंदरांत आलीं आहेत. बोटीनें १२० जर्मन एंजिनें आणि २ स्विस एंजिनें आणलीं आहेत. त्याशिवाय मुंबईतील लोकल गाड्यांसाठीं दोन अल्युमिनमचे डबेहि बोटीनें आणले.

**लष्कराच्या सामानाची चोरी**—द. कोरिआंतील अमेरिकन लष्कराच्या कोठारांतून ५० लाख डॉलर्सचा माल चोरण्यांत आल्याचें समजतें. हा सर्व माल कोरिआंत काळ्या बाजारांत विकला जात असे. चोरीच्या मालापैकीं २० लाख डॉलर्सचा माल परत मिळविण्यांत आला.

**बँकांत चोरांचे फोटो**—बँकेंत जाणाऱ्या लोकांनीं सावध रहावें म्हणून मद्रासमधील बँकांत कुप्रसिद्ध चोरांचे फोटो लावण्यांत येणार आहेत. त्याशिवाय शहरांतील सिनेमागृहें, बसेस व ट्रमगाड्या ह्यांच्यांतहि हे फोटो लावण्यांत येणार आहेत.

**प्रवासी आकर्षून घेण्यासाठीं**—इजिप्तमधील गिझा येथें असलेल्या दोन पिरॅमिडसवर रात्रीं प्रकाशझोत टाकण्याची व्यवस्था करण्याचा इजिप्त सरकारचा विचार आहे. प्रवाशांनीं रात्रींहि पिरॅमिडस पहाण्यास यावें, म्हणून हा उपक्रम करण्यांत येत असून जवळच एक विश्रांतिगृहहि उघडण्यांत येणार आहे.

**हत्तीच्या पिलांचें परदेशीं प्रयाण**—मद्रास बंदरांतून हत्तींचीं दहा पिलें घेऊन ' सिटी ऑफ पर्थ ' ही बोट अमेरिकेला गेली. त्यापैकीं दोन पिलें न्यूयॉर्क येथील प्राणिसंग्रहालयानें मागविलीं असून बाकीचीं आठ एका सर्कस कंपनीनें घेतलीं आहेत. हे छोटे गजराज म्हैसूर संस्थानांत पकडण्यांत आले.

**कॅमेरे जपानला परकीय हुंडणावळ देतात**—जपानमधून अलीकडे कॅमेऱ्यांची निर्यात बऱ्याच प्रमाणावर होत असून त्यामुळें त्या देशाला बरीच परकीय हुंडणावळ मिळत आहे. गेल्या वर्षी जपाननें २,४५,००० कॅमेरे तयार केले आणि त्यापैकीं ८० टक्के अमेरिकेला निर्यात केले. ह्या निर्यातीमुळें १६,००,००० पौंड परकीय चलन मिळालें.

# हिंदी शेड्यूल्ड बँकांच्या भारतांतील कचेऱ्या, ठेवी व कर्जें

## राज्यवार व लोकसंख्येवार वाटणी

| राज्य | लोकसंख्या | कचेऱ्या | दर कचेरीस लोकसंख्या | ठेवी (लक्ष रु.) | दर माणशी (ठेवी रु.) | कर्जें (लक्ष रु.) | दर माणशी कर्जें (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **गट १** | | | | | | | |
| १. आसाम | ९१,२९,४४२ | २२ | ४,१४,९७५ | ४,४० | ४.८ | ९९ | १.१ |
| २. बिहार | ४,०२,१८,९१६ | १२३ | ३,२६,९८६ | २२,४२ | ५.६ | १०,०६ | २.५ |
| ३. मुंबई | ३,५९,४३,५५९ | ४३८ | ८२,०६३ | २८१,७९ | ७८.४ | १७४,५४ | ४८.६ |
| ४. मध्यप्रदेश | २,१३,२७,८९८ | ११३ | १,६०,३६० | १४,०८ | ६.६ | ११,७४ | ५.५ |
| ५. मद्रास | ५,६९,५२,३३२ | ५२१ | १,०९,३१३ | ६९,१४ | १२.१ | ६५,२९ | ११.५ |
| ६. ओरिसा | १,४६,४४,२९३ | १२ | १२,२०,३५८ | १,७५ | १.२ | १,२८ | ८.७ |
| ७. पंजाब | १,२६,३८,६११ | १७२ | ७३४८० | ३७,५५ | २९.७ | १०,७१ | ८.५ |
| ८. उत्तर प्रदेश | ६,३२,५४,११८ | ३७५ | १,६८,६७८ | ६३,२३ | १०.० | ४०,९१ | ६.५ |
| ९. प. बंगाल | २,४७,८६,६८३ | १७७ | १,४०,०३८ | १७५,५७ | ७०.८ | १६१,१७ | ६५.० |
| **गट २** | | | | | | | |
| १०. हैद्राबाद | १,८६,५२,९३४ | ७५ | २,४८,७०६ | १९,६५ | १०.५ | १२,६७ | ६.८ |
| ११. मध्यभारत | ७९,४१,६४२ | ५४ | १,४७,०६७ | १२,४४ | १५.७ | ८,६७ | १०.९ |
| १२. म्हैसूर | ९०,७१,६७८ | ८३ | १,०९,२९७ | १८,८६ | २०.८ | ११,९४ | १३ २ |
| १३. पेप्सू | ३४,६८,६३१ | २० | १,७३,४३२ | १,६९ | ४.९ | ३७ | १०.७ |
| १४. राजस्थान | १,५२,९७,९७९ | ११४ | १,३४,१९३ | १७,३३ | ११.३ | १३,२२ | ८.६ |
| १५. सौराष्ट्र | ४१,३७,००५ | ५२ | ७९,५३९ | १८,२४ | ४४.१ | ३,५४ | ८.६ |
| १६. त्रावणकोर-कोचीन | ९२,६५,१५७ | १२८ | ७२,३८४ | १७,९० | १९.३ | ९,५३ | १०.३ |
| **गट ३** | | | | | | | |
| १७. दिल्ली | १७,४३,९९२ | ७४ | २३,५६७ | ४७,८३ | २७४.३ | १३,५१ | ७७.५ |
| १८. हिमाचल प्रदेश | ९,८९,४२७ | ४ | २,४७,३५९ | ३२ | ३.२ | ३ | ०.३ |
| १९. विंध्य प्रदेश | ३५,७७,४३१ | ४ | ८,९४,३५८ | २२ | ०.६ | १४ | ०.४ |
| २०. इतर | ३८,५०,८५६ | ३२ | १,२०,३३९ | ८,९० | २३.१ | १,८७ | ४.९ |
| एकूण | ३५,६८,९१,६२४ | २,६१३ | १,३६,५८३ | ८१३,३१ | २३.३ | ५५२,१८ | १५.५ |

### बी. सी. जी. लस व टयुबरक्युलिन टेस्ट

एप्रिल, १९५२ अखेर भारतांत २५ लक्ष लोकांना बी. सी. जी. लस टोचण्यांत आली. क्षयप्रतिबंधक शक्ति त्यांचिजवळ नैसर्गिकरीत्या आहे कीं नाहीं, हें पहाण्यासाठीं ७८ लक्ष लोकांची "टयुबरक्युलिन टेस्ट" घेण्यांत आली. बी. सी. जी. लस टोचण्यासाठीं लोकांची मागणी वाढत आहे.

### नॅशनल बँक ऑफ पाकिस्तानची कलकत्ता शाखा

नॅशनल बँक ऑफ पाकिस्तान कलकत्ता येथें लवकरच आपली एक शाखा उघडणार आहे, असें वृत्त आहे. तसें झाल्यास बँकेची ती भारतांतील पहिलीच शाखा होईल.

### भारत इं. बँकेच्या स्टाफ असोसिएशनचें स्नेहसंमेलन

वरील स्नेहसंमेलन बँकेचे एक डायरेक्टर, श्री रा. प्र. दामोदरे, बारामती, ह्यांचे अध्यक्षतेखालीं पार पडलें. अल्पोपहार, कॅरम मॅचेस, करमणुकीचे कार्यक्रम, क्रिकेट मॅच (स्टाफ वि. डायरेक्टर्स) अहवाल वाचन, अध्यक्षांचें भाषण, सिनेमा, इत्यादि कार्यक्रम आखण्यांत आला होता.

### आयात धान्य आगबोटींतून आणण्यास ४० कोटी रु. खर्च

१९५१ सालीं भारतानें बाहेरून अन्नधान्याची आयात केली, त्याच्या आगबोटींच्या वहातुकीसाठीं ४० कोटी रु. खर्च आला. हें धान्य आणण्यास ६,६६० आगबोटी लागल्या व त्यांतून ४७.२५ लक्ष टन धान्य आलें. त्याची किंमत २१६ कोटी रु. होती. १९५२ मध्यें ४५ लक्ष टन धान्य आयांत होईल अशी अपेक्षा आहे.

**THE TRAVANCORE OGALE GLASS MANUFACTURING CO. LTD., MANJUMMEL**

**NOTICE**

The Ninth Annual General Meeting of the Shareholders of the Company will be held on Saturday the 28th June, 1952, at 4.30 P. M. at the Registered Office of the Company at Manjummel (Glass Factory premises) to adopt the Directors' Report, audited Balance Sheet and Profit and Loss Account for the period ended 31st December 1951 and to elect two Directors in place of the retiring Directors Sri. J. E. A. Pereira and Sri. A. P. Tampi who retire by rotation according to Article 112 of the Articles of Association of the Company and are eligible for re-election and offer themselves as such and to appoint auditors for the current year and fix their remuneration.

By Order of the Board,
For OGALE BROTHERS LIMITED,
Trivandrum — Shankar Rao P. Ogale,
April 23, 1952 — Managing Agents.

**The Share Transfer Books of the Company will be closed from Monday the 16th June, 1952 to Saturday, the 28th June 1952, both days inclusive.**

# अर्थ

बुधवार, ता. १८ जून, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पाकिस्तानचा कापडाचा धंदा

पाकिस्तानमध्यें कापूस, लोकर आणि ताग ह्यांचें उत्पादन बरेंच होतें. परंतु त्या मानानें कापडाचा धंदा मात्र फारच अल्प प्रमाणावर आहे. पाकिस्तानमध्यें कापसाच्या कापडाच्या गिरण्या अवघ्या १६ आहेत, आणि त्या देशाच्या गरजेपैकीं फक्त ६·२ टक्के गरज भागवूं शकतात. लोकरीचें कापड तयार करणाऱ्या गिरण्या तर नाहींतच. जगांतील तागाच्या उत्पादनापैकीं ७५ टक्के ताग पाकिस्तानांत होतो. पण तागाच्या गिरण्या मात्र भारताच्या हद्दींत बसलेल्या आहेत येत्या दहा वर्षांत २५,००,००० चात्या असणाऱ्या सुताच्या गिरण्या उघडण्याचें पाकिस्तानी सरकारनें ठरविलें आहे. ह्या नव्या धंद्यांचें केंद्र म्हणून कराचीची निवड करण्यांत आली आहे, कारण प. पाकिस्तानच्या सर्व भागांना कराची हें जोडलेलें आहे आणि कापसाच्या निर्यातीचें तें एक मुख्य बंदर आहे. कराचींत पहिली कापडाची गिरणी १९४९ सालीं उघडण्यांत आली. ह्या गिरणींत ५०० माग आणि २५,००० चात्या आहेत. गेल्या वर्षी कराचींत आणखी दोन गिरण्या चालू झाल्या. त्यापैकीं एका गिरणींत २५,२०० चात्या आणि दुसरींत २५,००० चात्या आहेत. शिवाय पंजाबांतहि नव्या सुताच्या गिरण्या उघडण्यांत येत आहेत. पूर्व पाकिस्तान आणि भावलपूर ह्या ठिकाणींहि कांहीं गिरण्या उभारण्यांत आल्या आहेत. पाकिस्तानांत सुमारें ३,००,००० हातमाग असावे आणि त्यांच्यापासून दरवर्षी सुमारें २४,००,००,००० वार कापड तयार होत असावें असा अंदाज आहे नवीन उघडण्यांत येणाऱ्या सुताच्या गिरण्यांतील ५० टक्के चात्यांनीं हातमागास सूत पुरवावें अशी सरकारची अपेक्षा आहे.

पाकिस्तानांत सुमारें २,८०,००,००० पौंड लोकर निर्माण होते. पण त्यापैकीं २,००,००,००० पौंड लोकर इंग्लंडला व अमेरिकेला निर्यात होते. चांगल्या जातीचें लोकरी कापड व चांगला लोकरी धागा पाकिस्तानला आयात करावा लागत असे. कराचींत आतां लोकरीच्या गिरणीनें उत्पादनाला प्रारंभ केला आहे. ह्या गिरणींत १,००० चात्या आहेत आणि नुकत्याच आणखी ३,००० चात्या बसविण्यांत आल्या आहेत. पूर्व पाकिस्तानांत राजशाही जिल्ह्यांत २,००० एकर जमिनीवर रेशमाच्या किड्यांसाठीं लागणारीं तुतीचीं झाडें आहेत. पू. पाकिस्तानांत दरवर्षी ४०,००० पौंड कच्चें रेशीम तयार होतें. देशाच्या गरजेच्या मानानें हें उत्पादन अवघें २५ टक्के आहे. काश्मीर प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत रेशमाचा धंदा वाढविण्याचें पाकिस्तान सरकारनें तहकूब केलें आहे. पूर्व पाकिस्तानांत तागाच्या गिरण्या काढण्यास खाजगी भांडवल पुढें येईल अशी सरकारची अपेक्षा होती पण ती चुकली; म्हणून सरकारनें स्वतःच तीन तागाच्या गिरण्या काढण्याचें ठरविलें आहे. प्रत्येक गिरणींत १,००० माग असतील व त्यांचें सर्वांचें मिळून भांडवल ६,५०,००,००० रुपये असेल त्यापैकीं निम्में एका खाजगी कंपनीकडून मिळणार आहे. कच्च्या मालाची विपुलता आणि बाजारपेठा ह्या दोन्ही गोष्टी पाकिस्तानला अनुकूल आहेत.

---

## भारत व रशिआदि राष्ट्रांमधील व्यापार

भारत आणि रशिआदि पूर्व–युरोपांतील कम्युनिस्ट राष्ट्रें ह्यांच्या दरम्यान चालणाऱ्या व्यापारासंबंधींची माहिती नुकतीच लोकसभेंत देण्यांत आली. ह्या विषयासंबंधीं प्रश्न विचारण्यांत आला असतां उप–व्यापारमंत्री श्री. डी. जी. करमरकर म्हणाले कीं भारतानें १९५१–५२ सालीं रशिआला जो माल निर्यात केला त्याची किंमत ६,२७,१८,०४४ रुपये झाली. उलटपक्षीं भारतानें रशिआकडून १,३८,२९,९२७ रुपये किंमतीचा माल आयात केला. पोलंडला भारतानें ११,९१,५५४ रुपयांचा माल निर्यात केला आणि त्या देशाकडून ३३,५५,०३८ रुपयांचा माल घेतला. हंगेरीला भारतानें कांहींच माल निर्यात केला नाहीं. आयात मात्र ३०,०६,५१० रुपये किंमतीच्या मालाची केली. झेकोस्लोव्हाकिआला भारतानें १,१८,८३,९७३ रुपये किंमतीचा माल निर्यात केला आणि २८,०१,२५७ रुपये किंमतीचा माल आयात केला. रुमेनिआ आणि बल्गेरिआ ह्या देशांशीं व्यापार–व्यवहार झालाच नाहीं. युगोस्लाव्हिआशीं झालेला व्यापार अगदींच लहान प्रमाणावर झाला. भारतानें रशिआला मुख्यतः चहा, तागाच्या वस्तू, लाख, तंबाखू व मसाल्याचे पदार्थ निर्यात केले. आयात केलेल्या वस्तूंत कलात्मक वस्तू ५३ लाख रुपयांच्या आणि वृत्तपत्राचा कागद ६७ लाख रुपयांचा होता. झेकोस्लोव्हाकिआशीं केलेल्या कराराची मुदत गेल्या मार्च अखेर संपली असून नवीन करारासंबंधीं वाटाघाटी चालू आहेत. रशिआ आणि भारत ह्यांच्यामधील आयात–निर्यातींत जी तफावत आहे ती काढून टाकण्यासाठीं इतर देशांशीं झालेल्या व्यापारांतील अनुकूल तफावतीचा उपयोग करण्यांत आला.

---

## जर्मनीची स्पर्धा ब्रिटनला जाणवूं लागली

ब्रिटनची अर्थव्यवस्था सध्यां शस्त्रीकरणाचा मोठा कार्यक्रम आणि निर्यात ह्यांच्यांतील स्पर्धेमुळें नाजूक झाली आहे. ब्रिटनमध्यें नुकत्याच भरविण्यांत आलेल्या ब्रिटिश इंडस्ट्रिज फेअरमध्येंहि ही परिस्थिति जाणवली. बर्मिंगहॅम येथ भरलेल्या ह्या प्रदर्शनांत मुख्यतः एंजिनिअरिंगच्या कारखान्यांनीं भाग घेतलेला होता. प्रदर्शन पहाण्यासाठी बरेच परदेशी प्रतिनिधी आले होते. पण त्यांनीं ब्रिटिश कारखानदारांकडे फारशा मागण्या नोंदल्या नाहींत. कारण, प्रदर्शनांत आलेल्या जर्मन विक्रेत्यांनीं त्यांना अधिक आकर्षक अशीं प्रलोभनें दाखविलीं. बऱ्याच परदेशीय प्रतिनिधींनीं ब्रिटिश कारखानदारांकडे विचारणा केल्या. पण प्रत्यक्ष मागण्या मात्र गेल्या वर्षींच्या मानानें कमीच आल्या. ब्रिटनमधील ग्राहकांनीं मात्र अधिक माल खरेदी केला ब्रिटनमध्येंच नव्हे तर सर्व जगभरच जर्मन कारखान्यांचे प्रतिनिधी आपला माल खपविण्याचा प्रयत्न करीत आहेत मागणी केलेला माल ब्रिटिश कारखानदारांपेक्षा लवकर पुरविण्याचें अभिवचनहि ते देतात. शिवाय त्यांचा माल स्वस्ताहि असतो. तीव्र स्पर्धा आतां जर्मन कारखान्यांकडून होऊं लागली आहे.

---

## श्री. वा. पुं. वर्दे ह्यांची इं. फि. कॉर्पोरेशनवर निवड

श्री. वामनराव पुंडलीक वर्दे, बी. कॉम., ह्यांची इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे संचालक म्हणून नुकतीच निवडणूक झाली. त्याबद्दल आम्हीं त्यांचें अभिनंदन करतों. ह्यापूर्वीच ह्या जागीं निवडून आले असते, परंतु सौजन्यामुळें ते आपण होऊन मागें राहिले होते.

इं. फि. कॉर्पोरेशनचे हिंदी उद्योगधंद्यांच्या दृष्टीनें स्थान अत्यंत



महत्त्वाचें आहे. महाराष्ट्रीय कारखानदारांना, त्यांच्या योग्य योजनांचा कॉर्पोरेशनकडून सहानुभूतिपूर्वक विचार केला जाईल, असा विश्वास वाटण्यास श्री. वर्दे ह्यांच्या निवडणुकीमुळें आणखी एक सबळ कारण झालें आहे, आणि त्याचा शक्य तो फायदा आपले कारखानदार घेतील अशी खात्री वाटते. पश्चिम भारतांतील सहकारी, औद्योगिक व बँकिंग क्षेत्रांतील श्री. वर्दे ह्यांच्या उच्च स्थानास रिझर्व्ह बँकेच्या स्थानिक बोर्डावरील भारत सरकारकृत त्यांच्या नेमणुकीनें तीन वर्षांपूर्वीच मान्यता मिळाली आहे; इं. फि. कॉर्पोरेशनवरील प्रस्तुत निवडणुकीनें त्यांच्या यशानें आणखी एक मजल गांठली आहे. त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा देशास ह्याहीपेक्षां अधिक मिळावा, ह्या दृष्टीनें त्यांच्या प्रगतीकडे त्यांचे गुणज्ञ मित्र व चहाते पहात रहातील हें उघड आहे. बँकेंतील कनिष्ट स्थानापासून जीवनास प्रारंभ करणाऱ्या श्री. वामनरावांना हिंदी बँकिंगच्या केंद्रस्थानीं असलेल्या संस्थेचे प्रमुख होण्याचा मान व तेथून श्रेष्ठतर कामगिरी करण्याची संधि मिळेल, असा आम्हांस विश्वास वाटतो.

---

### दि त्रावणकोर ओगले ग्लास मॅ. कं. लि., मंजुमेल

ओगले बंधु लि. च्या मॅनेजिंग एजन्सीखालील वरील कंपनीनें १९५१ सालीं ७००,००० रु. किंमतीच्या मालाचें उत्पादन केलें. १९५० मधील उत्पादनापेक्षां तें १,००,००० रु. नीं जास्त आहे, कारण तयार मालाला किंमती अधिक चांगल्या आल्या. सर्व खर्च भागवून व ४२,२८९ रु. घसारा काढून कंपनीस ५०,१२० रुपये निव्वळ नफा उरला. ४०,००० रुपये डि. ई. फंडात टाकून १०,००० रु. जनरल रिझर्व्ह फंडाकडे वर्ग करावे, अशी डायरेक्टरांची शिफारस आहे. तयार मालाच्या किंमती उतरत आहेत, परंतु कंपनीच्या मालास मागणी उत्कृष्ट असल्यानें कारखान्यांत शिल्लक तयार माल अत्यल्प आहे. १९५१ अखेर बेलजमहून शीट ग्लासची मशीन्स आली. त्या उपक्रमाची प्रगति भरपूर पैसा हातीं येण्यावर अवलंबून आहे. इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशननें कंपनीला ५,००,००० रु. कर्ज मंजूर केलें आहे. त्यामुळें ऑटोमॅटिक बॉटल प्लँटची योजना लवकरच पुरी होऊन, नव्या मशिनरीवर वर्षअखेर उत्पादन सुरू होईल, अशी अपेक्षा आहे. कंपनीची वार्षिक सभा २८ जून रोजीं आहे.

---

**उत्पादनांत घट**—मेट्टूर आणि पायकारा वीज-निर्मिती केंद्रांतून कारखान्यांना पुरविण्यांत येणारी विजेची शक्ति ता. १५ मे पासून ५० टक्के कमी करण्यांत आली होती. त्यामुळें सूत, कापड व सिमेंटच्या उत्पादनांत सुमारें ४० टक्के घट झाली आहे.

## आर्थिक नियोजन आणि सहकार

### म्हैसूर संस्थान सहकारी परिषदेच्या ३८ व्या अधिवेशनांत श्री. सरय्या ह्यांनीं व्यक्त केलेले विचार

" सहकारी चळवळींत काम करणाऱ्यांनीं स्वतःस असा प्रश्न विचारणें जरूर आहे कीं, आधुनिक लोकशाही राज्यांत जें आर्थिक नियोजन चालतें त्यामुळें त्यांच्या दृष्टिकोनांत कांहीं फरक करणें इष्ट आहे कीं नाहीं ? सध्यां मी इतकेंच म्हणतों कीं हा प्रश्न फारच गंभीर स्वरूपाचा आहे. आर्थिक नियोजनाचे जे कार्यक्रम मध्यवर्ती सरकार अगर राज्य-सरकार आंखतील त्या कार्यक्रमांत स्वेच्छेचें सहकार्य कितपत सामाऊं शकेल असा एक प्रश्न उपस्थित होण्यासारखा आहे. सहकाराच्या चळवळीचीं तत्त्वें १९ व्या शतकांत प्रस्थापित झालीं. त्यावेळीं इंग्लंडच्या भांडवलप्रधान अर्थ-व्यवस्थेंत अनिर्बंध स्वातंत्र्याला महत्त्व होतें. ज्या आर्थिक व सामाजिक परिस्थितींत सहकाराचीं तत्त्वें प्रस्थापित झालीं, ती आतां पुष्कळच बदलली आहेत. आर्थिक व्यवहारांत आता राज्यसंस्था अधिकाधिक हस्तक्षेप करूं लागली आहे. नियोजित अर्थव्यवस्थेचीं मूलतत्त्वें आपल्या देशानें आतां स्वीकारलीं आहेत. ह्या अर्थव्यवस्थेचे जे निरनिराळे विभाग आहेत त्यांना असणाऱ्या संपूर्ण स्वातंत्र्याची नियोजित अर्थव्यवस्थेशीं कशी सांगड घालतां येईल ? खाजगी उद्योगधंद्यांच्या विभागाबाबत नियोजन-मंडळानें असें म्हटलें आहे कीं ह्या उद्योगधंद्यांना आपले मामुली व्यवहार करण्यास पूर्ण मुभा राहील. परंतु हें करतांना सुद्धा त्यांना योजनेचीं अंतिम उद्दिष्टें गांठण्यासाठीं जरूर असणारीं नियंत्रणें पाळावींच लागतील.

" हाच विचार सहकारी चळवळीलाहि लागू आहे. सरकारच्या वतीनें सहकारी संस्था जेव्हां कांहीं कामें अंगावर घेतील त्यावेळीं त्यांना सरकारी मदत मिळण्याचा हक्क आहे आणि त्यांनीं कांहीं प्रमाणांत सरकारशीं भागीदारीहि पत्करली पाहिजे. सरकारी मदत जोंपर्यंत सहकारी चळवळीच्या स्वयंभू स्वातंत्र्याला बाध आणीत नाहीं तोंपर्यंत अशी मदत आणि साहचर्य ह्यांचें स्वागतच झालें पाहिजे. ह्या बाबतींत एक चांगला दाखला मुंबई राज्यांत सांपडतो. मुंबई राज्यांत पतीवर कर्जें देण्यास लायक जे शेतकरी आहेत त्यांना पतीवर कर्जें देण्याचें काम सहकारी संस्थांनीं चालविलें आहे. मुंबई सरकारनें सर्वोच्च सहकारी बँकेच्या भांडवलाच्या उभारणीस मदत केली आहे आणि बँकेच्या ३२ डायरेक्टरांपैकीं तीन डायरेक्टरांच्या जागा आपल्या वतीनें भरल्या आहेत. सुप्रसिद्ध ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ मि. कोल म्हणतात कीं योग्य संधि मिळाल्यास सहकारी संस्थांनीं सरकारचे एजंट म्हणून एखादें काम करण्यास कांहीं हरकत नाहीं. उत्पादकांच्या सहकारी संस्थांना भांडवलाची अडचण नेहमींच भासते. त्यांनीं सरकारची मदत जरूर घ्यावी. मि. कोल ह्यांनीं हे विचार ग्राहकांच्या सहकारी संस्थांसंबंधीं व्यक्त केले असले तरी ते शेतीचें उत्पादन, शेतकींतील पतीचे व्यवहार आणि सहकारी बाजारदार ह्यांना लागू करतां येण्यासारखे आहेत. "

---

**जपानी बनावटीला विरोध**—इंग्लंडची राणी दुसरी एलिझाबेथ हिच्या राज्यारोहण प्रसंगीचें स्मरण रहावें म्हणून जपाननें कांहीं स्वस्त चिजा ब्रिटनला पाठविण्यास सुरवात केली आहे. ह्या वस्तूंत राणीचा फोटो असलेला एक ब्रूच आहे. पण त्यांतील फोटो ओळखतां न येण्यासारखा असल्यानें अशा वस्तूंवर बहिष्कार घालण्याची विनंति ब्रिटिश दुकानदारांना करण्यांत येत आहे.

## अमेरिकेची भारतास मदत– ११ करार

इंडो–अमेरिकन टेक्निकल को–ऑपरेशन करारांतील अकराव्या व शेवटच्या करारावर १४ जून रोजीं दिल्ली येथें सह्या झाल्या· म्हणजे, अमेरिका देणार असणाऱ्या ५ कोटी डॉलर्सच्या मदतीच्या विनियोगाच्या योजना आंखण्यांत आल्या. भारत सरकारला ह्या योजनांवर स्वतःचे ४१ कोटी, १ लक्ष रुपये खर्च करावे लागणार आहेत. ११ करारांतील योजनांचा तपशील येथें दिला आहे:—

| करार | अमेरिकन सरकारची (मदत डॉलर्स) | भारत सरकारचा खर्च (रुपये) |
|---|---|---|
| खत पुरवठा | १,०६,५०,००० | ४४,००,००० |
| लोखंड–पोलाद पुरवठा | ८३,८५,००० | १२,००,००० |
| टोळधाड निवारण | २,३०,००० | २,४८,००० |
| जमीन–खतें संशोधन | २,००,००० | ८,४२,५४० |
| मरीन फिशरीज संवर्धन | २४,६२,००० | ६८,९५,००० |
| ७२,००० ट्यूब विहिरी | १,३७,००,००० | ४,४४,५०,००० |
| ग्रामीण कार्यकर्ते शिक्षण | १,६६,००० | ७५,३७;००० |
| कम्युनिटी–डेव्हलपमेंट | ८६,७१,००० | ३४,३८,३४ ००० |
| मलेरिया प्रतिबंध | ६,४८,००० | ३७,३५० |
| जंगल संशोधन व वाळवंट प्रतिकार | १,०४,००० | २,०८,००० |
| नद्या खोरीं योजना | ४७,८४,००० | ५,००,००० |
| | ५,००,००,००० | ४१,०१,५१,८९० |

## चित्रळमध्यें लोखंड

पाकिस्तानांत चित्रळ संस्थानांत (सरहद्द प्रांत) ८ कोटी रुपये किंमतीच्या लोखंडाच्या खाणी सांपडल्या आहेत.

## माजी कमांडर–इन–चीफ गालिचे करणार

भारताचे एक माजी कमांडर–इन–चीफ फील्ड मार्शल ऑकिनलेक, हे सिंधमध्यें गालिचांचा कारखाना विकत घेण्याच्या खटपटींत आहेत.

## भारतांतील विदेशी कंपन्या

भारताच्या फाळणीनंतर, भारतांत १८ कोटी, २६ लक्ष रु. भांडवलाच्या २२ विदेशी फर्म्स नोंदण्यांत आल्या. त्यापैकीं २० ब्रिटनमधील, १ अमेरिकेंतील व १ स्वित्झरलंडमधील होती. ब्रिटिश कंपन्यांचें अधिकृत भांडवल व वसूल भांडवल अनुक्रमें १५·२५ कोटी रु. व १०·४८ कोटी रु. आहे.

## सेल्स टॅक्समधील घट

सेल्स टॅक्समधील उत्पन्नाच्या घटीमुळें मुंबई सरकारला ४½ कोटी रुपयांची तूट येणार असून, अर्थमंत्री डॉ. जिवराज मेहता हे २५ सप्टेंबर रोजीं नवी करवाढ जाहीर करतील, असें वृत्त प्रसिद्ध झालें आहे.

## चुकून ज्यास्त वसूल केलेला कर परत करणार

५ एप्रिल पासून, इनकम टॅक्स नव्या ऐवजी जुन्या दरानेंच कापून घेतला गेला त्यामुळें ब्रिटिश सरकारकडे २ कोटी पौंड जादा जमा झाले. हे परत करण्यास प्रारंभ करण्यांत आला आहे. दीड कोटी लोकांना त्याचा फायदा मिळेल.

## कापडाचें उत्पादन

भारतांतील कापडाचें उत्पादन सध्याच्याच गतीनें होत गेलें, तर १९५२ मधील उत्पादन १९४८ मधील उत्पादनाची बरोबरी करील, असा अंदाज आहे. कापडाची निर्गतहि वाढत आहे.

**तुतीच्या झाडांची लागवड**—फाळणीनंतर पूर्व पंजाबांत आलेल्या निर्वासितांनीं खेळण्याचें साहित्य तयार करण्याचे धंदे काढले होते. पाकिस्तानकडून ह्या धंद्याला लागणाऱ्या तुतीच्या लाकडाची आयात होत असे. परदेशी बाजारांत भारतीय क्रीडा-साहित्याची स्पर्धा होते म्हणून पाकिस्ताननें लाकूड पाठविण्याचें बंद केलें आहे. पंजाब सरकारनें तुतीच्या झाडांची लागवड करण्यासाठी योग्य जागा शोधावी, अशी भारत सरकारनें सूचना केली आहे.

**नवीन पोस्टऑफिसें**—नवीन पोस्टऑफिसें उघडण्याच्या सरकारच्या योजनेमुळें गेल्या दोन आर्थिक वर्षांत भारतीय सरकारला पुढील प्रमाणें नुकसान सोसावें लागलें:–१९५०–५१ शहरांतील पोस्ट–ऑफिसें २३,८६७ रुपये. ग्रामीण ७७,३४,५८३ रुपये. १९५१–५२ नागरी: २८,८०२ रुपये. ग्रामीण १९,६२,७७० रुपये. गेल्या वर्षीं भारतांत लहानमोठीं मिळून ५,२८९ नवीन पोस्टऑफिसें उघडण्यांत आलीं.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

**स्थापना १९३५ : शेड्यूल्ड बँक**

**संचालक मंडळ**

श्री· धों· कृ. साठे (अध्यक्ष) श्री· श्री· गो· मराठे (उपाध्यक्ष)
श्री· न· ग· पवार श्री· मा· रा· जोशी
श्री· फ· दो· पदमजी श्री· मा· वी· शहा
श्री· शं· ल· किर्लोस्कर श्री· भा· म· गुप्ते

**: बँकेच्या शाखा :**

मुंबई (फोर्ट, गिरगांव, दादर व कल्याण) पुणें (डेक्कन जिमखाना व खडकी), नाशिक, चाळीसगांव, धुळें, जळगांव, नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर, कोल्हापूर, द· हैद्राबाद, सांगली व अमरावती.

**पुण्यांत हिंदविजय टॉकीजसमोर बँकेच्या डेक्कन जिमखाना शाखेच्या नव्या जागेंत**

**सेफ डिपॉझिट व्हॉल्टसची**

**व्यवस्था करण्यांत आली आहे.**

मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें १.

चिं. त्रि. जोग,
मॅनेजर.



**'अर्थ' ग्रन्थमाला**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## वस्तूंच्या किंमतींतील चढउतार

**( भा. म. का. )**

१९५१ च्या एप्रिल महिन्यांत अन्नविषयक किंमतींचा निर्देशांक ४१२·५ होता तो मार्च १९५२ मध्यें ३४२·७ पर्यंत उतरला. अन्नविषयक किंमतींत विशेष उतार डिसेंबर १९५१ पासून होत गेला. त्या महिन्यांत निर्देशांक ३९९·१ होता. तो १९५२ च्या पहिल्या तीन महिन्यांत अनुक्रमें ३९३, ३७५·४ व ३४२·७ याप्रमाणें उतरत गेला. प्रत्यक्ष तृणधान्याच्या बाबतींत एप्रिल १९५१ मध्यें ४९० पासून मार्च १९५२ मध्यें ४४२ पर्यंत किंमतींचा निर्देशांक उतरत गेला. डाळींच्या किंमतींचा निर्देशांक एप्रिल १९५१ मध्यें ५०१ होता तो १९५२ च्या मार्चमध्यें ४१७ पर्यंत उतरला. इतर अन्नविषयक गोष्टींचा निर्देशांक याच काळांत २८९ पासून २०९ पर्यंत उतरला. अन्नविषयक पदार्थांच्या किंमतींत सुमारें १७ टक्के घट झाल्याचें दिसून येतें.

उद्योगधंद्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किंमतींचा उतार एप्रिल १९५१ मधील ६८३ निर्देशांकापासून मार्च १९५२ मध्यें दिसून आलेल्या ४२४·२ या निर्देशांकावरून दिसून येतो. हा उतार फार मोठा दिसत असला तरी या बाबतींत विशेष उतार आजच्या मंदीच्या काळांत झालेला आहे हें ध्यानांत पाहिजे. कारण फेब्रुवारी १९५२ मध्यें उद्योगधंद्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाचा निर्देशांक ५४५·४ होता तो पुढील महिन्यांत एकदम ४२४·२ पर्यंत उतरला. औद्योगिक कच्च्या मालापैकीं तेलबियांतील उतार फारच मोठा आहे. कारण १९५१ च्या मार्चमध्यें तेलबियांच्या किंमतींचा निर्देशांक ७१६ होता, तो डिसेंबर १९५१ मध्यें ६१८ झाला, व १९५२ च्या जानेवारी, फेब्रुवारी व मार्च ह्या महिन्यांत अनुक्रमें ६०९, ५५१ व ४१९ इतका उतरला. खनिज पदार्थांच्या किंमतींत विशेष चढउतार झाला नाहीं. कारण या बाबतींतला निर्देशांक एप्रिल १९५१ मध्यें ४७७, जुलैमध्यें ४५०, डिसेंबरमध्यें ४४४, व फेब्रुवारी, मार्च १९५२ मध्यें ४५६ वर स्थिर राहिला. कापूस, ताग या सारख्या तंतुमय पदार्थांच्या किंमतींत मोठा उतार पुढील आंकड्यांवरून दिसतो. एप्रिल १९५१ चा निर्देशांक ७४९ होता तो डिसेंबरमध्यें ५९९ होऊन, १९५२ च्या फेब्रुवारी व मार्च मध्यें अनुक्रमें ५८२ व ४३५ या प्रमाणें उतरला, याहि बाबतींत आजच्या मंदीच्या काळांतील घट ज्यास्त आहे.

अर्धवट पक्क्या मालाच्या किंमतींतहि विशेष उतार झालेला नाहीं. एप्रिल १९५१ मध्यें निर्देशांक ३८७·८ होता तो मार्च १९५२ मध्यें ३४३·२ झाला. या गटांत समाविष्ट होणाऱ्या खनिज तेलें व कापसाच सूत यांच्या किंमती जवळ जवळ स्थिर राहिल्या, परंतु वनस्पति तेलाच्या किंमती वरील काळांत ७२४ पासून ४१५ पर्यंत उतरल्या, व चामड्याच्या किंमती ५११ पासून ३२४ पर्यंत घटल्या. पूर्ण पक्क्या मालाच्या किंमतींहि बेतानेंच उतरल्या. कारण, एप्रिल १९५१ चा निर्देशांक ४११·७ होता तो मार्च १९५२ मध्यें ३८३·८ झाला. या गटांतील सुती कापडाच्या किंमती मात्र याच काळांत ५०१ पासून ४३७ पर्यंत उतरल्या. तागाच्या किंमतींत एप्रिल १९५१ मध्यें १०४५ पासून मार्च १९५२ मध्यें ५५४ पर्यंत घट आली. रेयॉन व रेशीम यांच्या किंमती बऱ्याच उतरल्या. कारण या बाबतींत एप्रिल १९५१ चा निर्देशांक ६७३ होता तो १९५२ च्या फेब्रुवारी व मार्चमध्यें अनुक्रमें ५३१ व ४७१ याप्रमाणें झाला. धातूंपासून बनणाऱ्या पक्क्या मालाच्या किंमती एप्रिल १९५१ चा निर्देशांक २७८ होता तो मार्च १९५२ मध्यें किंचित् वाढून ३१० झाला. लोकरीच्या मालाच्या किंमतींतहि ३२९ पासून ३८८ पर्यंत वाढ झाली.

येथपर्यंत अन्नधान्य, औद्योगिक कच्चा माल, अर्धवट पक्का माल, पूर्ण पक्का माल या चार गटांतील किंमतींच्या उताराची माहिती दिली. याशिवाय सर्वसाधारण किरकोळ वस्तूंच्या किंमतींच्या निर्देशांकांत एप्रिल १९५२ मध्यें ७५१·५ पासून मार्च १९५२ मध्यें ६२६·५ पर्यंत उतार दिसून आला. शेवटीं सर्व वस्तूंच्या किंमतींचा निर्देशांक याच काळांत ४५७·५ पासून ३७७·५ पर्यंत उतरला. हे सर्व सरकारी आंकडे ऑगस्ट १९३९ ला संपणाऱ्या एका वर्षाच्या किंमती आधारभूत म्हणजे १०० मानन तयार केलेले आहेत.

सामान्य जनतेच्या जीवनाच्या दृष्टीनें अन्नधान्याच्या किंमती, वनस्पती तेलाच्या व सुती कापडाच्या किंमती या विशेष परिणामकारक समजल्या पाहिजेत.

### लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयांत टाटा जन्मदिन

लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें, या संस्थेच्या विद्यमानें टाटा जन्मदिनोत्सवानिमित्त "मानवतेचे हक्क" या प्रदर्शनाचें उद्घाटन नामदार काकासाहेब गाडगीळ यांचे हस्तें नुकतेंच करण्यांत आलें. हें प्रदर्शन "यु ने स्को" या संस्थेकडून म्युझियम संस्थेस मिळालें आहे. या प्रदर्शनांत ११० दृश्यें आहेत. मानवतेच्या हक्कांचें संरक्षण, संवर्धन व संस्थापना कशी झाली याचा साद्यंत इतिहास या प्रदर्शनांत मांडिलेला आहे. ह्या प्रदर्शनाचें उद्घाटन करतांना ना. काकासाहेब गाडगीळ यांनीं म. जमसेद्जी टाटा यांनीं स्थापन केलेल्या जमसेदपूर येथील कारखान्याचें महत्त्व किती आहे हें विशद करून सांगितलें व "लोखंड व पोलाद" यांचें उत्पादन वाढविण्याच्या पुढील योजनांचेबद्दल माहिती सांगितली. मार्केट–टॉवरवरील विभागास भेट देऊन म. जमसेद्जी टाटा यांच्या अर्ध–पुतळ्यास त्यांनीं हार घातला. समारंभाचे शेवटीं "लोखंड व पोलाद" ही फिल्म दाखविण्यांत आली. टाटा जन्मदिनाचा समारंभ दोन दिवस चालला होता. पहिल्या दिवशीं पुणें विश्वविद्यालयाचे प्रोफेसर ढवळे यांनीं कित्येक शास्त्रीय प्रयोग करून दाखविले व संस्थेनें आणिलेल्या नवीन शास्त्रीय दृक्–प्रत्यय शिक्षणोपयोगी बहुमोल अशा साहित्याचें उद्घाटन केलें. श्री. सरदार जगन्नाथ महाराज पंडित यांनीं ना. काकासाहेब गाडगीळ यांचे यथोचित आभार मानिले.

### दि डेक्कन बँक्स असोसिएशनचें कार्यकारी मंडळ

दि डेक्कन बँक्स असोसिएशन, पुणे या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा होऊन संस्थेच्या चालू सालाकरितां खालीलप्रमाणें कार्यकारी मंडळ निवडण्यांत आलें आहे:—

१ अध्यक्ष—श्री. धों. कृ. साठे, बँक ऑफ महाराष्ट्र लि. पुणें.

२ उपाध्यक्ष—श्री. के. एम. कौजलगी, युनिअन बँक ऑफ विजापूर व सोलापूर लि. विजापूर.

३ ऑनररी सेक्रेटरी व खजिनदार—श्री. म. व्यं. शिंगरे, भोर स्टेट बँक लि. पुणें.

इतर सभासद बँका:—( ४ ) प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें. ( ५ ) भारत इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें. ( ६ ) बँक ऑफ पूना लि. पुणें. ( ७ ) बुधगांव बँक लि. बुधगांव ( ८ ) बँक ऑफ कराड लि. कराड ( ९ ) रत्नाकर बँक लि. कोल्हापर.

## आयुर्विमा कंपनीचा एजंट

हिंदी विमा कंपन्यांच्या एजंटांची संख्या सालोसाल वाढत गेली आहे, हें खालील तक्त्यावरून दिसून येईल. १९४८ पूर्वीचे आकडे अविभक्त भारतासंबंधीचे आहेत.

**विमा एजंटांची संख्या**

| वर्ष | लायसेन्सधारी एजंट | वर्षातील नवे एजंट | वर्षात एजन्सी सोडलेले एजंट |
|---|---|---|---|
| १९४५ | १,५६,४५५ | ६६,५५३ | ३३,५२९ |
| १९४६ | २,०५,४४६ | ८२,५२० | ४८,४५४ |
| १९४७ | २,४२,२३७ | ८५,२४५ | ६८,०६८ |
| १९४८ | २,५६,४८९ | ८२,३२० | ८६,४७३ |
| १९४९ | २,५५,४०५ | ८७,३८९ | ७४,६६८ |

**बिनामी स्त्री-एजंट**

वरील एजंटांच्या संख्येंत स्त्रियांचा भरणा अपेक्षेपेक्षां फार मोठा आहे, असें आढळून येईल. ह्या स्त्री-एजंट बहुधा नामधारीच असतात; त्यांच्या नांवानें पुरुषच एजन्सचें काम करतात. "आमचें नांव हप्त्यांच्या नोटीसा, पावत्या, लॅप्स नोटिसा, इत्यादींवर छापूं नका" असें ह्या स्त्री-एजंट नेहमीं सांगत असतात. ज्याचा विमा उतरलेला असेल, त्याला कित्येक वेळा त्याचा विमा-कंपनीच्या दप्तरीं नमूद एजंट कोण आहे, हें माहीतहि नसतें. अशी परिस्थिति असूनहि अशा बिनामी एजंटांचा विमेच्छुबाबतचा गुप्त रिपोर्ट विमा कंपन्या सरळ मान्य करून त्यांचे आधारावर पॉलिसी देत असतात!

१९४९ मधील एकूण एजंटांपैकीं २६·३% स्त्रिया होत्या. त्यांचें प्रमाण सालोसाल वाढत चाललें आहे:—

| वर्ष | एकूण एजंटांत स्त्री-एजंटांचें प्रमाण |
|---|---|
| १९४६ | १३·८% |
| १९४७ | १८·३% |
| १९४८ | २१·३% |
| १९४९ | २६·३% |


वरील आकड्यांवरून, हिंदी स्त्रियांचें आर्थिक व्यवहारांत उच्च स्थान आहे, असें कोणी अनुमान काढलें, तर तें अगदीं खोटें ठरेल हें उघड आहे. प्रचलित सामाजिक परिस्थितींत, स्त्रियांनीं विमा-कामाचा एवढा मोठा वांटा उचलणें अशक्य आहे.

**विमा एजंटांची प्राप्ति**

श्री. एन. व्ही. नायुडू ह्यांनीं "इंडियन फिनॅन्स" मध्यें, विमा एजंटांबाबत आकडेवार माहिती देऊन त्यांच्या प्राप्तीचा अंदाज केला आहे. त्यावरून असें अनुमान निघतें कीं, सर्व प्रकारच्या विम्यांच्या एजन्सीमधून प्रत्येक विमा एजंटास सालिना सरासरीनें ३४३ रु. प्राप्ति होते. एजंट विमेदारांना रिबेट देतात, तो बेकायदा असल्या कारणानें त्याचा हिशेब धरण्यांत आलेला नाहीं.

**एजंट असे असतात**

१९४८ सालीं जितक्या एजंटांनीं लायसेन्स घेतले, त्यांपैकीं ४३·९% एजंटांनीं ते १९४९ मध्यें रिन्यू केले नाहींत. म्हणजे, त्यांनीं धंदा बंद केला, इतकेंच नव्हें तर रिन्युअल कमिशनवरील आपला हक्कहि बुडविला. थोडक्यांत म्हणजे, हिंदी विमा कंपन्यांस काम मिळवून देणाऱ्या एजंटांची संख्या पुष्कळ मोठी आहे, परंतु ते सर्व थोडें, थोडें काम देणारे आहेत. त्यांतील दोन पंचमांश एजंट लायसेन्स रिन्यु करून घेण्यासाहि तत्पर नसतात आणि एकूण एजंटांपैकीं एक चतुर्थांश एजंट बिनामी काम करणारे असतात; त्यांना त्यांनीं स्वतः मिळविलेला विमेदारहि माहीत नसतो व त्यांना विम्याच्या कामाचा गंधहि नसतो.

SAVE to help yourself and the NATION
WITH THE HOME SAFE

THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
*Branches:* Dadar, Mahim, Poona & Belgaum

## साधन संपत्तीच्या विकासासाठी सहकारी संघटनेची आवश्यकता

**रत्नागिरी जिल्हा द. भाग सहकारी परिषदेचे अध्यक्ष, श्री. वा. पुं. वर्दे, ह्यांचें भाषण.**

"जिल्ह्याच्या विशिष्ट परिस्थितीप्रमाणें एका गांवाकरतां एक काम करणारी स्वतंत्र संस्था असून भागणार नाहीं. कारण येथील खेडीं विखुरलेलीं आहेत. यासाठीं कांहीं खेड्यांचे गट करून, विशिष्ट गटांतील गांवांकरतां एक मध्यवर्ती विविध कार्यकारी संस्था काढणें सोयीचें होईल, व त्यामुळें अल्प प्रमाणांत उपलब्ध असलेल्या स्थानिक पुढाऱ्यांचा आपणांस जास्तींतजास्त उपयोग करून घेतां येईल. विविध कार्यकारी संस्थांनीं संबंधित अशींच कामें अंगिकारण्याची खबरदारी घ्यावी. उदाहरणार्थ, बँकिंगचें काम करणाऱ्या संस्थांनीं व्यापार-उदिमाचीं कामें पत्करूं नयेत.

"या जिल्ह्यांत होणारीं पिकें भात, नागली, वरी व कडधान्यें हीं पुरेशीं नाहींत. परंतु आंबे, काजू, नारळ, सुपारी, फणस हीं पिकें मोठ्या प्रमाणावर होतात. तसेंच जंगलांत हिरडे, निरनिराळ्या प्रकारचें लाकूड मिळतें. समुद्रांत मासे मिळतात. ही साधन-संपत्ति लोकांच्या आर्थिक जीवनांत भर घालणारी आहे. परंतु जिल्ह्याच्या सर्वसाधारण मागसलेपणामुळें या सर्व साधनसंपत्तीचा आधुनिक पद्धतीनें विकास झालेला नाहीं. हा विकास करून घ्यावयाचा तर भौगोलिक, आर्थिक व सामाजिक दृष्टीनें विचार केल्यास शेती व लहान लहान औद्योगिक धंदे यांची उभारणी सहकारी तत्त्वावर करणें हा उपाय आहे.

"तरूण जनता हजारांच्या संख्येनें मोठमोठ्या शहरांत चरितार्थाकरितां जाते. हा ओघ बंद करून त्यांचेकरितां स्थानिक साधनें उपलब्ध करून दिलीं पाहिजेत. निरनिराळ्या सहकारी कमिट्यांनीं सूचित केल्याप्रमाणें लहान सहान उद्योगधंद्यांची वाढ या भागांत सहकारी तत्त्वावर होणें शक्य आहे. या भागांतून फळफळावळ व मच्छी बऱ्याच प्रमाणांत बाहेर जाते. रत्नागिरी आंबा व मालवणी मच्छी यांना फार प्रसिद्धि मिळालेली आहे. सबब, सहकारी कार्यकर्त्यांना अशी कळकळीची विनंति करावयाची आहे कीं, आंबा बागाईतदार व कोळी यांच्या फळें व फिश कॅनिंग संस्था काढून नाशवन्त अन्न टिकाऊ करण्याचे उद्योगधंदे काढावेत. या सर्व योजनांची नीट आखणी करून—भांडवल, तज्ज्ञ माणसें वगैरे यांची जुळणी करून—नंतरच ते ते धंदे काढण्यांत यावेत. योजनेचे अभावीं ते यशस्वी होणार नाहींत, या जिल्ह्याची भौगोलिक रचना, समाजव्यवस्था, आर्थिक दुरवस्था; मागासलेपणा या सर्व दृष्टींनीं विचार करतां या जिल्ह्याची सामाजिक व आर्थिक उन्नति करून घेण्यास सहकाराशिवाय दुसरें साधन नाहीं."

## शेड्यूल्ड व बिगर शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या, १९३८–१९५१

| अखेरी | शेड्यूल्ड बँका: इंपीरिअल बँक | शेड्यूल्ड बँका: एक्सचेंज बँका | शेड्यूल्ड बँका: इतर शेड्यूल्ड बँका | शेड्यूल्ड बँका: एकूण | बिगर शेड्यूल्ड बँका | सर्व बँका |
|---|---|---|---|---|---|---|
| **भारत आणि ब्रह्मदेश** | | | | | | |
| १९३८ | ३५८ | ९३ | ६७७ | १,१२८ | ३४३ | १,४७१ |
| १९३९ | ३८१ | ९९ | ७९८ | १,२७८ | ६७३ | १,९५१ |
| १९४० | ३९० | १०१ | ८६० | १,३५१ | ८११ | २,१६२ |
| १९४१ | ४०१ | ९९ | ९५४ | १,४५४ | १,०१४ | २,४६८ |
| **अविभक्त भारत** | | | | | | |
| १९४२ | ३९२ | ८२ | ९७४ | १,४४८ | १,२६० | २,७०८ |
| १९४३ | ३९८ | ८४ | १,४०० | १,८८२ | १,५३१ | ३,४१३ |
| १९४४ | ४१९ | ७९ | १,९७७ | २,४७५ | १,९८५ | ४,४६० |
| १९४५ | ४२६ | ७७ | २,४५४ | २,९५७ | २,३७८ | ५,३३५ |
| **भारत युनियन** | | | | | | |
| १९४६ | ३९८ | ५८ | २,४४१ | २,८९६ | २,०२९ | ४,८८६ |
| १९४७ | ३६२ | ६० | २,५६५ | २,९८७ | १,८३२ | ४,८१९ |
| १९४८ | ३६७ | ६२ | २,५३४ | २,९६३ | १,७११ | ४,६७४ |
| १९४९ | ३७७ | ६४ | २,४११ | २,८५२ | १,५८९ | ४,४४१ |
| १९५० | ३८२ | ६२ | २,३३५ | २,७७९ | १,५७४ | ४,३५३ |
| १९५१ | ३९१ | ६३ | २,२०६ | २,६६० | १,५१८ | ४,१७८ |


पहिल्याच मूल्यमापनांत नफा वाटणारी

**दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.**

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

★ प्रमाणशीर खर्चात मिळेल असें फक्त निवडक काम घेणें हें कंपनीचें ध्येय आहे, व यांतच विमेदारांचें अंतिम हित आहे. ★

सर्वत्र प्रतिनिधी पाहिजेत.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

**ठेवी स्वीकारण्यांत येतात**

ठेवीवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता: 'PEDNECO' Bombay

**दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.**

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

पुणें २.

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,११,४८५
खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.



हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व
... काळे बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.